# Vedanti from TOS Pune bags the bronze medal

Vedanti Barge from The Orchid School participated in the district level roller speed skating competition and won the Bronze medal. She is a student of Class VIII Coral and is passionate about skating.

## यंगस्टर क्लबचे स्केटिंगमध्ये यश

**बालेवाडी, ता. १२ : पुणे जिल्हा रोलर स्पीड स्केटिंग कॉम्पिटिशन २०१९ च्या जिल्हास्तरीय स्पर्धा नुकत्याच पार पडल्या. यामध्ये बाणेर येथील संजोग तापकीर यांच्या यंगस्टर स्पोर्टस क्लबच्या खेळाडूंनी चांगली कामगिरी करत क्लबचे नाव उज्ज्वल केले.**



बाणेर : यंगस्टर स्पोर्ट क्लबची (डावीकडून) वेदांती बर्गे, सुयोग तापकीर, रिया गायकवाड आणि मध्यभागी मोहर कुलकर्णी पदके दाखविताना.

रोलर स्केटिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने या स्पर्धांचे आयोजन विमाननगर येथील आंतरराष्ट्रीय रिंक व पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील मोरवाडी याठिकाणी करण्यात आले होते. यामध्ये बाणेर येथील यंगस्टर स्पोर्टस क्लबच्या सुयोग तापकीर या खेळाडूने खुल्या वयोगटातील इंनलाईन स्केटिंग प्रकारात विमाननगर येथील १५,००० मी. रिंक रेसमध्ये सुवर्णपदक ,१०,००० मी. रिंक रेसमध्ये रौप्यपदक, तर मोरवाडी येथे १५,००० मी., व १०,००० मी. रस्त्यावरील रेस, प्रत्येकी एक रौप्यपदक अशी एकूण चार पदके मिळवली.

तर रिया गायकवाड या खेळाडूने इनलाईन स्केटिंग प्रकारात वयोगट ११-१४ मध्ये १०० मी. व १००० मी. मोरवाडी रोड रेस दोन्हीमध्ये रौप्यपदक पटकावले, तर मोहर कुलकर्णी व वेदांती बर्गे या दोन खेळाडूंचे विशेष कौतुक करावे लागेल. कारण हे दोन्ही खेळाडू प्रथमच जिल्हास्तरीय स्केटिंग स्पीड रेसमध्ये सहभागी झाले असून दोघांनीही पदके पटकावली. यामध्ये मोहर कुलकर्णी इनलाईन स्केटिंग या प्रकारात वयोगट ५ ते ७ यामध्ये ४०० मी. रिंक रेसमध्ये सुवर्णपदक, ६०० मी. मध्ये रौप्यपदक मिळवले, तर वेदांती बर्गे हिने क्वाड्स स्केटिंग प्रकारात ११ ते १४ वर्षे वयोगटात ५०० मी. रिंक रेसमध्ये कांस्यपदक मिळवत यश संपादन केले. या चार खेळाडूंपैकी सुयोग तापकीरची निवड राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झाली असून, या स्पर्धा २० ते २४ नोव्हेंबर रोजी नंदुरबार येथे होणार आहेत. यशस्वी खेळाडूंवर परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे .

The event was held in the month of November 2019.

Congratulations – Vedanti !